

# शालेय शिक्षण विभाग

## अर्थसंकल्प : २०२३-२४

## महाराष्ट्र शासन

समर्थन
अर्थसंकल्प अध्ययन केंद्र
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२० ☎ ०२२-२२००३०६०
Email: samarthanmumbai97@gmail.com/samarthanmumbai1997@gmail.com/ : www.samarthanadvocacy.org

# समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

**सचिव : डॉ. आशिष भोसले**


संपादन : **मुक्ता भारती /हिंदप्रभा कर्वे**

**विश्लेषण आणि संकलन:**
**रुपेश कीर -९८९२९३९६१७**

विशेष सहाय्य :
**निलम काकड, स्नेहा घरत, विलास सुवरे, राजश्री कदम व उमेश सांगळे**

मांडणी व अक्षरजुळणी :
**प्रतिक्षा कोयंडे**


**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

**प्रकाशक (पत्रव्यवहार):**
**समर्थन -** १०५, लोटस हाऊस,
लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटलजवळ,
सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मरिन लाईन्स (पू),
मुंबई -४०० ०२० ☏ ०२२-२२००३०६०
Email:samarthanmumbai97@gmail.com,
samarthanmumbai1997@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org


# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे ‘समर्थन’

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे ‘समर्थन’. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

## ‘समर्थन’च्या कामाचे विविध स्तर

- ◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- ◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- ◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- ◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- ◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- ◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- ◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- ◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# टिपण वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- ‘समर्थन’ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती टिपणाचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. हे टिपण माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २०१५-१६ पासून २०२१-२२ पर्यंत प्रत्यक्ष खर्च आणि २०२२-२३ सुधारित अंदाज तसेच २०२३-२४ चे अर्थसंकल्पीय अंदाज समाविष्ट केले आहेत.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्य
- प्रमुख सामाजिक सेवांचे विभागवार टिपण टप्प्या-टप्प्याने प्रसिद्ध करण्यात येईल.

विश्लेषण आणि संकलन:
रुपेश कीर -९८९२९३९६१७

मार्गदर्शक-विवेक पंडित
संस्थापक, समर्थन

# शालेय शिक्षणाची ठळक वैशिष्ट्ये

## राज्यातील प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळांचे वास्तव

**प्राथमिक स्तरावर शिक्षणाची स्थिती चिंताजनक :**

- वर्ष २०१९-२० मध्ये प्राथमिक शिक्षण देणाऱ्या १ लाख ६ हजार ४९१ शाळा कार्यरत होत्या त्यापैकी २०२१-२२ पर्यंत ६४३ शाळा बंद झाल्या आहेत.
- वर्ष २०१९-२० मध्ये सर्व शाळांमधून १ कोटी ५६ लाख ९० हजार विद्यार्थी शिक्षण घेत होते. वर्ष २०२१-२२ मध्ये या विद्यार्थ्यांच्या संख्येत २ लाख ७० हजारांनी घट झाली आहे.
- वर्ष २०२१-२२च्या आकडेवारीनुसार १ लाख ५ हजार ८४८ शाळांपैकी ३ हजार ९१६ शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र शौचालये नाहीत.
- राज्याचा एकूण साक्षरता दर ८२.३४ टक्के इतका असून स्त्रियांमधील साक्षरता दर ७५.८७ टक्के इतका आहे.
- इयत्ता ९ वी ते १० वी मधील १०.८१ टक्के मुलांची तर १०.६१ टक्के मुलींची गळती होते.
- वर्ष २०१९-२० मध्ये शिक्षकांची संख्या ५ लाख ३० हजार इतकी होती वर्ष २०२१-२२ मध्ये त्यात ३० हजारांने घट झाली असून ही संख्या ५ लाखांवर आली आहे.
- ३ हजार ९१६ शाळांमध्ये आजही मुलींसाठी शौचालय नाही.
- १२ हजार १७३ शाळांना संरक्षक भिंत बांधण्यात आलेली नाही.
- ३८ हजार ९५२ शाळांमध्ये मुलांना शिकण्यासाठी संगणकाची व्यवस्था केलेली नाही.
- ७ हजार ३०४ शाळांमध्ये दिव्यांग मुलांसाठी उतरता रस्ता नाही.
- १४ हजार ५०१ शाळांमध्ये मुलांना खेळण्यासाठी खेळाचे मैदान नाही.
- ११ हजार ३२६ शाळांमध्ये मुलांना ग्रंथालय उपलब्ध नाही.
- १ हजार ८०० शाळांमध्ये विद्युत जोडणीच झालेली नाही, तर इतर सोयी-सुविधांचा प्रश्नच येत नाही.
- वर्ष २०२१-२२ मध्ये एकूण विद्यार्थ्यांपैकी उच्च प्राथमिक स्तरावर २ लाख ३५ हजार ९२६ मुलांची गळती झाली.

## माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर शाळांचे प्रमाण वाढले परंतु शिक्षणाचे स्वास्थ्य बिघडले:

- वर्ष २०१९-२० मध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या २८ हजार ९३ इतकी होती त्यामध्ये वर्ष २०२१-२२ पर्यंत ५१९ ने वाढ झाली असून ही संख्या २८ हजार ६१२ इतकी झाली आहे.
- २८ हजार ६१२ शाळांपैकी ५४४ शाळांमध्ये मुलींकरिता शौचालये नाहीत.
- १ हजार ५४५ शाळांना संरक्षक भिंत बांधलेली नाही.
- ३ हजार ३३ शाळांना दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उतरता रस्ता बांधलेला नाही.
- १ हजार ३४५ शाळांमध्ये खेळाचे मैदान नाही.
- १ हजार ४०२ शाळांमध्ये ग्रंथालय नाही.
- २५८ शाळांमध्ये विद्युत जोडणी झालेली नाही, त्यामुळे इतर मूलभूत सोयी-सुविधांचा प्रश्नच येत नाही.
- ३ हजार ९७७ शाळांमध्ये संगणकाची सुविधा उपलब्ध नाही तर ६ हजार ७२४ शाळांमध्ये संगणक आणि त्यासाठी लागणारे इंटरनेटही उपलब्ध नाही.
- वर्ष २०२१-२२ मध्ये ७ लाख १० हजार ४८० मुलांची माध्यमिक स्तरावर गळती झाली.

## महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा अध्ययन क्षमतेचा स्तर खालावला:

- इयत्ता तिसरीतील विद्यार्थ्यांचा अध्ययन क्षमतेचा स्तर भाषा - २२ टक्के, गणित -१७ टक्के तर परिसर विज्ञान -१५ टक्के इतका कमी आहे.
- इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांचा अध्ययन क्षमतेचा स्तर भाषा -१७ टक्के, गणित - ३० टक्के तर परिसर विज्ञान -२९ टक्के एवढा इतका कमी आहे.
- इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांचा अध्ययन क्षमतेचा स्तर भाषा -१६ टक्के, गणित -२७ टक्के, विज्ञान -३८ टक्के तर सामाजिक शास्त्र -३५ टक्के इतका कमी आहे.
- इयत्ता १०वी तील विद्यार्थ्यांचा अध्ययन क्षमतेचा स्तर आधुनिक भारतीय भाषा -४६ टक्के, इंग्रजी - ४१ टक्के, गणित -३३ टक्के, विज्ञान - ७७ टक्के तर सामाजिक शास्त्र - ५८ टक्के इतका कमी आहे.

## दिव्यांगांसाठी स्वतंत्र विभाग स्थापन मात्र मागील काळात दिव्यांग विद्यार्थ्यांवरील खर्चात सातत्याने घट!

तक्ता क्र.१ *( रु. कोटीत )*

| इयत्ता | २०२०-२१ | | २०२१-२२ | | २०२२-२३ (ऑक्टोबर पर्यंत) | | वर्ष २०२०-२१च्या तुलनेत २०२२-२३ मध्ये वाढ/घट | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाखात) | खर्च | लाभार्थी (लाखात) | खर्च | लाभार्थी (लाखात) | खर्च | लाभार्थी (लाखात) | खर्च |
| १ली ते ८वी | २.५१ | ४३.४१ | २.२० | ०.३२ | २.०२ | ०.०१ | -०.४९ | –४३.४० |
| ९वी ते १२वी | ०.५७ | ०.२४ | ०.५७ | ०.७५ | ०.५५ | ०.०१ | -०.०२ | -०.२३ |
| एकूण | ३.०८ | ४३.६५ | २.७७ | १.०७ | २.५७ | ०.०२ | -०.५१ | -४३.६३ |

- इयत्ता १ली ते १२वी मध्ये शिकणाऱ्या दिव्यांग मुलांचा विचार करता वर्ष २०२०च्या तुलनेत वर्ष २०२२-२३ मध्ये ५१ हजार इतके लाभार्थी घटले असून खर्चात रु.४३.६३ कोटींची घट झाली आहे.
- प्राथमिक स्तरावर (इ. १ली ते ८वी) वर्ष २०२०-२१ मध्ये २ लाख ५१ हजार लाभार्थ्यांवर रु. ४३ .४१ कोटी खर्च झाले होते. त्या तुलनेत वर्ष २०२१-२२ मध्ये लाभार्थ्यांची संख्या ३१ हजाराने घटली असून ही संख्या २ लाख २० हजारावर आली तर खर्चात रु. ४३.०९ कोटी घट झाली असून केवळ रु. ३२ लाख खर्च झाले.
- प्राथमिक स्तरावर वर्ष २०२०-२१च्या तुलनेत ४९ हजार लाभार्थी घटले असून खर्चात रु.४३.४० कोटी इतकी कपात झाली आहे.
- माध्यमिक स्तरावर (इयत्ता ९वी ते १२वी) वर्ष २०२०-२१मध्ये ५७ हजार लाभार्थ्यांवर रु. २४ लाख खर्च झाले होते. त्या तुलनेत वर्ष २०२१-२२ मध्ये लाभार्थ्यांची संख्या तेवढीच राहिली असून खर्चात मात्र रु. ५१ लाखांनी वाढ झाली आहे.
- वर्ष २०२२-२३ मध्ये वर्ष २०२०-२१च्या तुलनेत लाभार्थ्यांची संख्या २ हजाराने घटली असून खर्चात देखील २३ लाखाने घट झाली असून केवळ रु. १ लाख खर्च झाला आहे.

**मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी असलेली उपस्थिती भत्ता योजना कागदावरच:**

- वर्ष २०२०-२१ या वर्षात कोविड-१९ काळात एक रुपयाही खर्च करण्यात आला नाही. परंतु त्यानंतर वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये देखील या योजनेवर खर्च झालेली रक्कम रुपये शून्य इतकी आहे.

*(स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०२२-२३)*


# शालेय शिक्षण विभाग

सामाजिक आणि आर्थिक विकासाची प्रगती सुकर करण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व सर्वमान्य आहे. शिक्षणामुळे वैयक्तिक आणि सामूहिक नावलौकिक मिळविण्याच्या संधी उपलब्ध होतात. लोकांना कौशल्य व ज्ञान मिळवून देऊन त्यांना उत्पादक रोजगारीची संधी मिळवून देणे आणि पर्यायाने राज्याच्या आर्थिक विकासाला गतिमान करण्यासाठी तसेच युवकांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शिक्षण हे एक अत्यंत निर्णायक साधन आहे. शिक्षणाद्वारे व्यक्तीचे केवळ लेखन व वाचन संस्था विकसित करणे एवढेच अपेक्षित नसून व्यक्तीमधील सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांचा विकास करून, परिपूर्ण व्यक्तिमत्त्व घडविणे हे शिक्षणाचे अंतिम ध्येय आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्याला यापुढे भौतिक पायाभूत सुविधांसोबत सामाजिक पायाभूत सुविधा (Social Infrastructure) निर्माण करण्यावर भर द्यावा लागणार आहे. महाराष्ट्रात भौतिक पायाभूत सुविधांसाठी ज्या गतीने निधी उपलब्ध होतो. तशीच गती शिक्षणाचा समावेश असणाऱ्या सामाजिक पायाभूत सुविधांवर करणे क्रमपात्र ठरते.

## मागील ७ वर्षांत शालेय शिक्षण विभागाच्या एकूण अर्थसंकल्पात सरासरी खर्च केवळ रु. ५० हजार २९ कोटी !

*आलेख क्र. १.* *(रु. कोटीत)*

शालेय शिक्षण विभागाचा अर्थसंकल्प





| | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ४०१४६ | ४२६२१ | ४८८४४ | ५१५६५ | ६०६०६ | ६१३१६ | ६२८१७ | ६६८८६ | ७३६६६ |
| सुधारित अंदाज | ४००६२ | ४१५६४ | ४६१८२ | ४८४७८ | ५७९४४ | ५५५९० | ६०१४६ | ६९३०८ | |
| प्रत्यक्ष खर्च | ३७४५६ | ३९०२३ | ४१९३६ | ४४३८० | ५४८१० | ५३७८६ | ५८८१२ | | |

*(स्रोत : वित्तविषयक विवरणपत्र व अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका, निव्वळ रकमा) टीप: वर्ष २०२२-२३चे सुधारित अंदाज व वर्ष २०२३-२४ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **वर्ष २०१५-१६ ते वर्ष २०२१-२२ या मागील ७ वर्षांत शालेय शिक्षण विभागाचा सरासरी खर्च हा रु.५० हजार २९ कोटी इतका झाला.**
- **मागील ७ वर्षांत सुधारित अंदाज हे मोठ्या स्वरूपात मांडले गेले मात्र विभागाला त्या प्रमाणात निधी उपलब्ध झाल्याचे दिसून येत नाही.**
- **त्यामुळे वर्ष २०२३-२४ चे अर्थसंकल्पीय अंदाज व वर्ष २०२२-२३ मधील सुधारित अंदाज हे मोठ्या स्वरूपात मांडले जाऊनही विभागाला मात्र त्यामानाने कमीच निधीची उपलब्धता होईल.**

## गेल्या ७ वर्षात प्राथमिक शिक्षणावर झालेला खर्च ५३ टक्के!

*आलेख क्र. २*





*(स्रोत: खर्चाचा प्रधानशीर्ष नि विभागवार सारांश व लोकलेखा, अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका, निव्वळ रकमा)*
*टीप: वर्ष २०२२-२३चे सुधारित अंदाज व वर्ष २०२३-२४ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **वर्ष २०१९-२० मध्ये शिक्षणावरील एकूण खर्चापैकी सर्वाधिक रक्कम ५५.१०% प्राथमिक शिक्षणावर खर्च करण्यात आली होती. मात्र वर्ष २०२०-२१ मध्ये पुन्हा त्यात ०.६१% घट होऊन हा खर्च ५४.४९% आला. वर्ष २०२३-२४ मधील अर्थसंकल्पीय अंदाज आणखी घटले असून हा खर्च ५४.२६% वर आला आहे.**
- **वर्ष २०१५-१६ ते वर्ष २०२१-२२ या ७ वर्षात शिक्षणावर होणाऱ्या एकूण खर्चात प्राथमिक शिक्षणावर होणारा सरासरी खर्च केवळ ५३.२१% राहिला आहे.**
- **गेल्या ७ वर्षात प्राथमिक शिक्षणासाठी सर्वात कमी निधी वर्ष २०१५-१६ मध्ये ५०.१६% उपलब्ध झाला होता. तर २०१९-२०मध्ये सगळ्यात जास्त ५५.१०% निधी खर्च झाला आहे.**
- **मात्र मागील ७ वर्षांत प्राथमिक शिक्षणासाठीचा खर्च प्रत्यक्षात एकाही वर्षी ५५% च्या वर गेलेला नाही. यामुळे यापुढेही प्रत्यक्षात कमी निधी उपलब्ध होणार हे गृहित धरले पाहिजे.**

# राज्य अर्थसंकल्पापैकी सर्वसाधारण शिक्षणावर झालेला सरासरी खर्च १५ टक्के!

*आलेख क्र. ३*

**राज्य अर्थसंकल्पापैकी सर्वसाधारण शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण**




| | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | १५.०८ | १६.४८ | १६.०१ | १४.५९ | १५.६० | १४.८२ | १४.९३ | १३.३० | १३.७० |

*(**स्रोत** : संक्षिप्त अर्थसंकल्प, व खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा, निव्वळ रकमा)*
***टीप**: वर्ष २०२२-२३चे सुधारित अंदाज व वर्ष २०२३-२४ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*


- **राज्य अर्थसंकल्पापैकी सर्वसाधारण शिक्षणावर मागील ७ वर्षांत सरासरी १५.३५% निधी उपलब्ध झाला.**
- **सर्वसाधारण शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचा आलेख पाहता असे दिसते की, शासनाने वर्ष २०१६-१७ मध्ये सर्वात जास्त १६.४८% इतका खर्च केला होता. तर वर्ष २०२०-२१ मध्ये ते सर्वात कमी १४.८२% इतका होता.**
- **मागील ७ वर्षात सर्वसाधारण शिक्षणावर होणारा खर्च हा राज्य अर्थसंकल्पाशी तुलना करता कधीच १७ टक्क्यांपेक्षा जास्त झालेला नाही.**

> ***अर्थसंकल्पात सांगितल्याप्रमाणे शालेय शिक्षणावर ३० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च करण्यात येत असला तरी गुणात्मक फरक दिसून येत नाही तसेच विभागाने सर्वसाधारण शिक्षणावर राज्याच्या एकूण महसुली खर्चाच्या १/६ निधी खर्च करणे गरजेचे आहे. मात्र शासनाने कधीच तेवढा निधी खर्च केलेला नाही.***
>
> *-स्रोत: अर्थसंकल्प, २०२३-२४ आणि कार्यक्रम अंदाजपत्रक, २०२३-२४ शालेय शिक्षण (प्राथमिक शिक्षण)*

## सर्वसाधारण शिक्षण व तंत्रशिक्षणावरील खर्च

## राज्य स्थूल उत्पन्नाच्या केवळ २ टक्के!

*आलेख क्र.४*




*(स्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प, व खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा, निव्वळ रकमा)*
*(टीप: शिक्षणावरील एकूण खर्चात २२०२, सर्वसाधारण शिक्षण व २२०३, तंत्र शिक्षण यांचा समावेश आहे)*
*(टीप: वर्ष वर्ष २०२२-२३ चे सुधारित अंदाज व वर्ष २०२३-२४चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **शिक्षणावरील खर्च हा २२०२, सर्वसाधारण शिक्षण व २२०३, तंत्र शिक्षण या प्रधान शीर्षांच्या अंतर्गत होतो. या दोन्ही शीर्षांवर होणाऱ्या खर्चाचे राज्य स्थूल उत्पन्नाशी असलेले प्रमाण वर्ष २०१५-१६ ते २०२१-२२पर्यंत सरासरी २.१६% इतके होते.**
- **वर्ष २०१९-२० मध्ये सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षण यावरील खर्चाचे प्रमाण २.६०% इतके होते. मात्र त्यानंतर त्यामध्ये सातत्याने घट होत गेली आहे.**
- **वर्ष २०१८-१९ मध्ये सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षण यावर खर्चाचे प्रमाण १.९१% इतके कमी होते.**

## शाळाबाह्य शाळेत दाखल झालेली व दाखल न होऊ शकलेली बालके!

तक्ता क्र. २

| अक्र | जिल्हा | २०२०-२१ | | २०२१-२२ | | २०२२-२३ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | शाळाबाह्य मुलांची संख्या | त्यातील शाळेत दाखल झालेली मुले | शाळाबाह्य मुलांची संख्या | त्यातील शाळेत दाखल झालेली मुले | शाळाबाह्य मुलांची संख्या |
| १. | अहमदनगर | ९८८ | ५३० | ५७८ | ५४१ | ५८५ |
| २. | अकोला | ५८९ | ५८९ | ४११ | ४३७ | ३६३ |
| ३. | अमरावती | ५९४ | ५७६ | ५९५ | ५९४ | ४६४ |
| ४. | औरंगाबाद | २५९ | २५९ | ३६ | ३६ | ३५४ |
| ५. | बीड | ५९२ | ५९२ | २८२ | २८२ | ४१७ |
| ६. | भंडारा | ९७ | ९७ | ७९ | ७९ | ७१ |
| ७. | बुलडाणा | २९७ | २८३ | १४७ | १४७ | ५२४ |
| ८. | चंद्रपूर | ३६८ | ३६८ | ४०७ | ४०७ | ४१९ |
| ९. | धुळे | ६८१ | ६८१ | १५९ | १६० | १८३ |
| १०. | गडचिरोली | ४६ | ४६ | ३२१ | ३१९ | २१८ |
| ११. | गोंदिया | १४९ | १४९ | १६१ | १२९ | ९८ |
| १२. | हिंगोली | ३८४ | ३८४ | १६७ | १६७ | ३९६ |
| १३. | जळगाव | १३७९ | १३७९ | ७१५ | ७१५ | ८५७ |
| १४. | जालना | ५४९ | ५४९ | ४५ | ४४ | ५१ |
| १५. | कोल्हापूर | ३१२ | ३०९ | २३४ | २१६ | २३७ |
| १६. | लातूर | २०० | २०० | १८९ | १८९ | २०० |
| १७. | मुंबई उपनगर | ६६८ | २०८ | १७६६ | २३९३ | ७१५ |
| १८. | मुंबई | ३२५ | ७८५ | ३१४ | १५३ | ३२८ |
| १९. | नागपूर | ३३२ | ३३२ | २९६ | ३०८ | १८५ |
| २०. | नांदेड | ६४७ | ६४७ | ६९५ | ६९५ | ४२१ |
| २१. | नंदुरबार | १५६२ | १५२३ | १२२३ | १२२८ | २३७ |
| २२. | नाशिक | ६०९ | ६०९ | २८७४ | २८७४ | ९९६ |
| २३. | उस्मानाबाद | ३०० | २९९ | २५१ | २५० | १६७ |
| २४. | पालघर | १७१७ | १९३३ | २२८५ | २२८५ | १६२९ |
| २५. | परभणी | १५१५ | १२९९ | २९८ | २८८ | ३६९ |
| २६. | पुणे | ४२९७ | ४१११ | ३१३५ | ८२७ | ३२९२ |
| २७. | रायगड | ४६६ | ४६० | ४४३ | ३२२ | २४९ |
| २८. | रत्नागिरी | २२६ | २१० | २०७ | १७७ | १८९ |
| २९. | सांगली | ४४६ | ४४६ | ५२४ | ५२४ | ३९४ |
| ३०. | सातारा | २८७ | २८७ | २२३ | २२३ | ३७ |
| ३१. | सिंधुदुर्ग | १७३ | १७३ | १९३ | १४४ | ८० |
| ३२. | सोलापूर | १२८३ | १२८३ | ३४६ | १४८ | २१४ |
| ३३. | ठाणे | ३३५४ | ३३५४ | ३२९८ | ३२८४ | ४२८८ |
| ३४. | वर्धा | १२८ | १२८ | १९६ | १९९ | ३४८ |
| ३५. | वाशिम | २४६ | २४६ | १२८ | १२८ | ११९ |
| ३६. | यवतमाळ | ३८८ | ३८८ | ३०१ | २८५ | १२१ |
| | एकूण | २६४५३ | २५७१२ | २३५२२ | २११९७ | १९८१५ |

*(स्त्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई दि. २३/०२/२०२३ रोजी प्राप्त माहिती)*

- माहिती अधिकारात प्राप्त झालेल्या माहितीनुसार वर्ष २०२०-२१ मध्ये राज्यात एकूण २६ हजार ४५३ मुले शाळाबाह्य आढळली. त्यापैकी २५ हजार ७१२ शाळाबाह्य मुलांना पुन्हा शाळेत दाखल करण्यात शासनाला यश मिळाले आहे, तर ७४१ मुले शाळाबाह्य राहिली.
- वर्ष २०२१-२२ मध्ये राज्यातील २३ हजार ५२२ मुले शाळाबाह्य आढळली. त्यातील २१ हजार १९७ मुलांना पुन्हा शाळेत दाखल करण्यात आले. तर २ हजार ३२५ मुलांना शाळेत दाखल केले गेले नाही.
- वर्ष २०२२-२३ मध्ये एकूण १९ हजार ८१५ मुले शाळाबाह्य आढळली. सदर वर्षाची आकडेवारी ही केंद्र शासनास प्रस्तावित केलेली आकडेवारी आहे. तर शासनाची शाळाबाह्य मुलांची आकडेवारी अद्याप शिक्षण विभागाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे वर्ष २०२२-२३ मध्ये राज्यातील एकूण किती मुले शाळाबाह्य आहेत तसेच त्यापैकी किती मुलांना शाळेत दाखल करण्यात आले आहे हे स्पष्ट होत नाही.

## विद्यार्थ्यांसाठी सायकल खरेदीत लाखोंचा अपव्यय!

पालघर जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यात सायकलीचे सुट्टे भाग जुळवून सायकल बनविण्याचा एक कारखाना असून आयएसआय प्रमाणीकरण नसलेल्या कंपन्यांच्या मार्फत उत्पादित केलेले सुट्टे भाग एकत्र करून त्यावर नामांकित कंपन्यांचे स्टीकर चिटकविण्याचा उद्योग सुरू असून शाळांकडून अशा सुमार दर्जाच्या सायकल विद्यार्थ्यांसाठी खरेदी केल्या जात आहेत. त्यामुळे थेट हस्तांतरण योजनेचा गैरवापर होत आहे, योजनांच्या अंमलबजावणीतील होणारा हा भ्रष्टाचार थांबविणार कोण हा खरा प्रश्न आहे.

## शालेय शिक्षण व क्रीडा विभागातच २०० पैकी ४८ पदे रिक्त !

तक्ता क्र. ३

| अक्र. | पद | मंजूर पदांची संख्या | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| | | **गट - अ** | | |
| १ | प्रधान सचिव | १ | १ | ० |
| २ | सह सचिव | १ | १ | ० |
| ३ | उप सचिव | ४ | ४ | ० |
| ४ | (विधि) | १ | ० | १ |
| ५ | अवर सचिव | ११ | १० | १ |
| ६ | उप संचालक (सांख्यिकी) | १ | ० | १ |
| ७ | निवडश्रेणी लघुलेखक | १ | १ | ० |
| | | **गट - ब** | | |
| ८ | कक्ष अधिकारी | २१ | २१ | ० |
| ९ | सहाय्यक कक्ष अधिकारी | ५५ | ४३ | १२ |
| १० | संशोधन सहाय्यक | ३ | २ | १ |
| ११ | उच्च श्रेणी लघुलेखक | ७ | ४ | ३ |
| १२ | निम्न श्रेणी लघुलेखक | ११ | ४ | ७ |
| | | **गट - क** | | |
| १३ | लघु टंकलेखक | १ | ० | १ |
| १४ | लिपिक टंकलेखक | ६१ | ४७ | १४ |
| १५ | वाहन चालक | १ | १ | ० |
| | | **गट - ड** | | |
| १६ | शिपाई | २० | १३ | ७ |
| | **एकूण** | **२००** | **१५२** | **४८** |

(स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती दि. २० फेब्रुवारी २०२३)

- **शालेय शिक्षण व क्रीडा विभागात दि. ३१डिसेंबर२०२२ पर्यंत २०० पदे मंजूर असून १५२पदे भरली गेली आहेत. तर ४८ पदे रिक्त आहेत.**
- **गट - अ ची २० पदे मंजूर असून १७ पदे भरली गेली आहेत तर ३ पदे रिक्त आहेत. विधि, उप संचालक सांख्यिकी व निवड श्रेणी लघुलेखक ही महत्त्वाची पदे रिक्त आहेत.**
- **गट - ब ची ९७ पदे मंजूर असून त्यापैकी २३ पदे रिक्त आहेत. गट - ब मध्ये १२ सहाय्यक कक्ष अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत.**
- **गट - क ची ६३ पदे मंजूर असून ४८ पदे भरली गेली आहेत तर १५ पदे रिक्त आहेत. गट - क मध्ये १४ लिपिक व टंकलेखकांची पदे रिक्त आहेत.**
- **गट - ड ची २० पदे मंजूर असून १३ पदे भरली गेली आहेत तर ७ पदे रिक्त आहेत.**

## माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयात ६६ पैकी ३८ पदे रिक्त!

तक्ता क्र. ४

| अक्र. | पदनाम | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक अधिक्षक | ०६ | ०२ | ०४ |
| २ | मुख्य लिपिक | ०७ | ०६ | ०१ |
| ३ | वरिष्ठ लिपिक | १४ | ०९ | ०५ |
| ४ | कनिष्ठ लिपिक | २० | ०२ | १८ |
| ५ | निम्नश्रेणी लघुलेखक | ०२ | - | ०२ |
| ६ | शिपाई | १५ | ०७ | ०८ |
| | **एकूण** | **६६** | **२८** | **३८** |

*(स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती दि. २० फेब्रुवारी २०२३)*

- **सहाय्यक अधिक्षक ते शिपाई अशी ६६ पदे मंजूर असून त्यापैकी २८ पदे भरली गेली आहेत तर ३८ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांचे हे प्रमाण ५८ टक्के इतके मोठे आहे.**
- **सहाय्यक अधिक्षकाची ६ पदे मंजूर असून केवळ २ पदे भरली गेली आहेत तर ४ पदे रिक्त आहेत.**
- **कनिष्ट लिपिकांची २० पदे मंजूर असून २ पदे भरली गेली आहेत. तर १८ पदे रिक्त आहेत.**

## शिक्षण आयुक्त कार्यालयात ३८२ पैकी २२९ पदे रिक्त!

## रिक्त पदांचे प्रमाण ६०% इतके मोठे

तक्ता क्र. ५

| अक्र. | संवर्गाचे नाव | एकूण मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | गट-क | २७५ | १०७ | १६८ |
| २ | गट-ड | १०७ | ४६ | ६१ |
| | **एकूण** | **३८२** | **१५३** | **२२९** |

*(स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती दि. १८ फेब्रुवारी २०२३)*

- **शिक्षण आयुक्त कार्यालयात दि. ३१ डिसेंबर, २०२२ अखेर पर्यंत गट- क व गट -ड संवर्गातील मंजूर भरलेली व रिक्त पदे यांची संवर्गनिहाय ३८२ पदे मंजूर असून त्यापैकी केवळ १५३ पदे भरली गेली तर २२९ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांचे हे प्रमाण ६० टक्के इतके मोठे आहे.**
- **गट-क ची २७५ पदे मंजूर असून १०७ पदे भरली गेली आहेत तर १६८ (६१%) पदे रिक्त आहेत.**
- **गट-ड ची १०७ पदे मंजूर असून ४६ पदे भरली गेली आहेत तर ६१ (५७%) पदे रिक्त आहेत.**